दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/०२८/२०१७-१८
दि.०७/०३/२०१८.

माहितीचा अधिकार

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.**

श्री.संपत तुळशीराम गायकवाड, ................अपिलार्थी
दैनिक जनतेचा महानायक,
रुम नं.१२, तिसरा मजला, कमलकुंज अपार्टमेंट,
रॉलेक्स टिंबर मार्टच्या वर,
घाटकोपर (प.), मुंबई ४०००८६.

जनमाहिती अधिकारी तथा, ................प्रतिवाद
आस्थापना अधिक्षक (आस्थापना)

## -: विवेचन :-

श्री.संपत तुळशीराम गायकवाड यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांचेकडे दि.२४/०१/२०१८ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

१) श्री.दिपक खांबीत (कार्यकारी अभियंता), २) श्री.नितीन मुकणे (उप-अभियंता) ३) श्री.यतीन जाधव (उप-अभियंता) या तिन्ही अभियंत्यांच्या भरती, पदोन्नती, बदली शैक्षणिक प्रमाणपत्र व जात विषयक प्रमाणपत्राच्या (जात पडताळणी) व जातीचा दाखला यांच्या छायांकित प्रती मिळण्याबाबत.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**

माहिती अधिकार अंतर्गत अपुर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याने अपिलार्थी यांनी दि.२२/०२/२०१८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**

अपिलार्थी अर्जदार व जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.०७/०३/२०१८ रोजी दुपारी १२.३० वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.आस्था/२३१/२०१८ दि.२८/०२/२०१८ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **<u>अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद</u>**:- माझ्या दि.२२/०२/२०१८ रोजीच्या पत्रानुसार मला अपुर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिलेली आहे.

२) **<u>जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-</u>** अपिलार्थी अर्जदार यांना माहिती देण्यात आलेली आहे. पुनश्च अभिलेखात शोध घेऊन माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**-: <u>निर्णय</u> :-**

१) जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांनी अपिलार्थी अर्जदारास सुधारित माहिती १० दिवसांत विनाशुल्क देण्यात यावी. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात आले.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

(दिपक पुजारी)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति:-

१) श्री.संपत तुळशीराम गायकवाड, — प्रत मिळाली
दैनिक जनतेचा महानायक,
रुम नं.१२, तिसरा मजला, कमलकुंज अपार्टमेंट,
रॉलेक्स टिंबर मार्टच्या वर,
घाटकोपर (प.), मुंबई ४०००८६.

प्रत मिळाली
12/3/2018

१) जन माहिती अधिकारी तथा
आस्थापना अधिक्षक (आस्थापना)

२) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना) यांचे कार्यालय.

India Post
BHAYANDER (401101)
GSTIN No: 27AAAGT0114P1Z5
EM947183059IN
Counter No:1,OP-Code:RVO
To:SAMPAT I GAIKWAD,